**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४३/२०१८-१९/ 19 दिनांकः 28/01/2019

**आदेश**

**आदेश केस क्र. ४३(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | मे. त्रिमूर्ती स्पिनिंग मिल्स,<br>२०/२ जुना मॅनमेड रोड तिळवणी<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग इचलकरंजी ग्रामिण | |

**कोरमः-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर त्यांचे दिनांक १०.०८.२०१८ चे आदेशा प्रमाणे त्यास तिळवणी उपकेंद्रामधून तात्काळ विज जोडून द्यावी. विज जोडणी करीता तक्रारदाराने केलेला खर्च १२ टक्के द.सा.द.शे. व्याजासह करारपत्राचे दिनांक २०.१२.२०१७ पासून, त्यांचे नियमीत मासीक देयका मधून परतावा देणेकरीता आदेश व्हावेत, हया करीता दाखल केली आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार हयांचे गट क्र. २०/२ जुना मॅनमेड रोड, तिळवणी इचलकरंजी जि.कोल्हापूर यांचे एच.टी.औद्योगिक कनेक्शन २५०४९९०५३८७० हया क्रमांकाने, १३५ K.W. हया मंजूरी भाराने आहे. तक्रारदारांस ९३३ kw हया वाढीव भाराची गरज असल्याने त्यांनी त्यासाठी दिनांक ३०.०६.२०१७ रोजी अर्ज दिला असता, सदरचा वाढीव भार, अधीक्षक अभियंता, कोल्हापूर हयांनी SE/ KC/T/ HT/ Est/ M/s.Trimurti/8158 दिनांक ०७.०९.२०१७ चे पत्रानुसार दिनांक ३०.०८.२०१७ चे SC/kc/ T/ HT/ DDF/1/3% /Ich/Urban/82/17-18 चे तांत्रिक मंजूरीनुसार २२०/३३ KV EHV Tilawani Sub-Station च्या ३३kv Industrial Feeder, वरुन देण्याकरीता मंजूर केला आहे. सदर विज जोडणी बद्दल तक्रारदारास, तक्रार अर्जात नमुद केल्याप्रमाणे रु. २८,१४,१७०/- चे अंदाजपत्रक देण्यात आलेले असून सदर रक्कमा , तक्रारदाराने, धनादेशाद्वारे दिनांक २१.०९.२०१७ रोजी भरलेल्या आहेत.

३) तक्रारदाराचे कथनानुसार , तिळवणी उपकेंद्र ते चांदूर उपकेंद्र व माणगांव उपकेंद्र हयातील ३३kv वाहिनी ही अंदाजे १५ ते २० किलोमीटर अंतराची असून, त्यातील केवळ ०.३६ कि.मी. ची काही विद्युत खांबामधीलच लाईन डबल सर्किट करणे व सध्या अस्तित्वात असलेल्या ३३kv लाईनचे ३३kv Line reconducting करणे हया करीता सदर मंजूरी देण्यांत आलेली आहे.

४) तक्रारदाराचे कथनानुसार , जरी सदर मंजूरी DDF योजनेतून देण्यात आलेली असली तरी, कार्यकारी अभियंता स. व सु. विभागीय कार्यालय इचलकरंजी हयांनी हा विज पुरवठा ORC योजनेतून दिलेला आहे व तसा करार देखील दिनांक २०.१२.२०१७ रोजी उभयतात झालेला आहे. राज्य विज नियामक आयोगाचे पत्र क्र. ३९५५ दिनांक २०.०७.२०१७ , नुसार सप्लाय कोड व शेडयुल ऑफ चार्जेसमध्ये नमूद असले खर्चा व्यतीरिक्त, ग्राहकाने केलेला सर्व खर्च ORC हया योजनेतील खर्चासह ग्राहकास परत करण्याचा आदेश असून देखील दिनांक २०.०७.२०१७ चे कराराप्रमाणे , तक्रारदाराची विज जोडणी ORC योजने खाली असल्याचे , विज कंपनीचे म्हणणे आहे.

५) हया पूर्वी तक्रारदाराला २२० kv तिळवणी उपकेंद्रातील ३३/११kv चांदूर उपकेंद्रातून दिला गेला होता. चांदूर उपकेंद्रावर विद्युत भार जास्त होत असल्याने , वाढिव विज पुरवठयासह तो विज पुरवठा थेट २२० kv तिळवणी उपकेंद्रातील ३३kv वाहिनीवरुन घ्यावा लागेल असे विज वितरण कंपनीतर्फे सांगण्यात येते. तिळवणी उपकेंद्रापासून निघणारी ३३kv वाहिनी ही काही अंशी Double Circuit अशी अस्तीत्वात होती. तक्रारदारास वाढिव विज पुरवठा करतांना तिळवणी उपकेद्रातून मंजूर करतांना , सदर वाहिनी मधील सिंगल सर्किटचा भाग, डबल सर्किट करणे करीता ग्राहकाला अंदाजपत्रक देवून , त्यास सदर लाईन डबल सर्किट करणेकरीता सर्व खर्च करावयास लावलेला आहे. सदर प्रकार Tapping of Line हया प्रकारांत मोडतो.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

३३kv वाहिनी मधील अधला मधला भाग डबल सर्किट करणे व ३३kv Line reconducting करणे ही कामे DDF मध्ये समाविष्ठ होवू शकत नाहीत. DDF योजनेत उपकेंद्रापासून स्वतंत्ररित्या सुरु होवून , ग्राहकाचे उद्योगापर्यन्त , स्वतंत्ररित्या पोहोच विणारी विज वाहिनी , ही अभीप्रते आहे. अधली मधली वाहिनी Double circuit करणे, किंवा Reconducting करणे ही System improvement or maintenance ही विज वितरण कंपनीने स्वत:खर्चाने करावयाची कामे आहेत. त्यासाठी विज जोडणी मंजूरी DDF योजने खाली आणि त्यासाठीचा खर्च ORC योजने खाली , ग्राहकाकडून करुन घेण्यात आलेला आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक ३०.०८.२०१८ रोजी, १५ दिवसांचे आत, सदर विज पुरवठा तिळवणी उपकेंद्रातून घ्यावा असा आदेश पारीत करुन सुध्दा तक्रारदारास विज पुरवठा , माणगांव उपकेंदातून दिलेला असून तक्रारदाराने केलेला खर्च निष्फळ ठरविलेला आहे. जर माणगांव उपकेंद्रातून विज पुरवठा देणे शक्य होते तर २२०kv उपकेंद्र तिळवणी येथून डबल सर्किटचा खर्च तक्रारदारास का करावयास लावला? असा प्रश्न तक्रारदाराने उपस्थित केला आहे. दिनांक २०.१२.२०१७ चा करार हा कायदेशीर आहे व तो बंधनकारक आहे. त्यात सदर विज पुरवठा ORC योजने खाली आहे असे नमूद आहे ORC योजना बेकायदेशीर असल्याचे आदेश मा. राज्य नियामक आयोगाने दिलेले आहेत व ते मा. सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेले आहेत. हया व अश्या कथनांवरुन, तक्रारदारांनीवर नमूद मागण्या केलेल्या आहेत.

६) प्रस्तुत प्रकरणाची नोटीस मिळाल्यानंतर प्रतिवादी वित वितरण कंपनीने हजर होऊन आपले लेखी म्हणणे खालील प्रमाणे दाखल केलेले आहे.

## वि. प. यांची भूमिका.

तक्रारदारांचे वाढीव लोड मंजूरी प्रमाणे ०.३ K.m. डबल सर्किट ०.२ Panther, ०.१२ k.m. सिंगल सर्किट ०.१ D.o.g., २४० Sq.mm भूमीगत वीज वाहिनी १२० मि. X २ हे काम करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे वरील सर्व कामे करुन घेतली . त्यानंतर नविन लाईन चालू करते वेळेस व वाढिव विज जोड चालू करतेवेळीस ग्राहकाने ३३kv चंदूर वाहिनी वरुन केबल काढून नविन केलेल्या ०.१२ k.m.सिंगल सर्किटला जोडलेली होती.(३३kv औद्योगिक वाहिनी) लाईन सुरु करतांना डिस्क फॅाल्टी असलेने, वाहिनी वारंवार बंद होत होती. हया वाहिनीला ३३kv आवाडे मळा उपकेंद्राची वाहिनी डबल सर्किट असल्यामुळे हया वाहिनीचे शटडाऊन अडचणीमुळे , तक्रारदारांस तात्पुरत्या स्वरुपांत ३३kv माणगांव फिडर वरुन वाढिव विज पुरवठा केलेला आहे. सदर वाहिनी चालू करणेसाठी डिस्क बदलून प्रयत्न केले असता, त्याच वाहिनीवरचे दुस-या ठिकाणचे डिस्क फॅाल्टी निघाले. सदर वाहिनीचे फॅाल्टी डिस्क बदलणे कामी, देखभाल दुरुस्तीसाठी Estimate No. EE/Ich/Maint/०७/१८-१९ मंजूर करवून घेवून १०२ डिस्क बदलणेचे काम दिनांक १०.०९.२०१८ रोजी करुन घेण्यात आलेले आहे. उर्वरीत फॅाल्टी डिस्क बदलण्याचे काम दिनांक १२.११.२०१८रोजी करुन घेण्यात येईल व त्यानंतर, तक्रारदारांचे कनेक्शन ३३kv औद्योगिक वाहिनीवर वर्ग करणे कामी योग्य ती कार्यवाही करणेत येईल.सदरचे काम DDF योजनेतून केलेले आहे.त्यामुळे तक्रारदारास परतावा देता येणार नाही. अश्या कथना वरुन विज वितरण कंपनीने प्रस्तुतची तक्रार नामंजूर करावी अशी मागणी केलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

७) हया प्रकरणांची सुनावणी दिनांक ०८.०१.२०१८ रोजी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारतर्फे श्री हरिभाऊ खापरे हे ग्राहक प्रतिनिधी तर विज वितरण कंपनीतर्फे श्री एस.डी. अकिवाटे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता उपविभाग इचलकरंजी ग्रामिण उपविभाग, इचलकरंजी हे हजर होते. त्या उभतांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

८) प्रस्तुत प्रकरणांत आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदारांस देण्यात आलेला विज भार DDF योजनेखाली दिलेला आहे हे प्रतिवादी विज वितरण केले आहे काय? | नाही |
| २ | तक्रारादारांस त्यांने केलेला खर्च परत मिळण्यास , तो पात्र आहे काय? | होय |
| ३ | सदर तक्रार संपूर्णत/ मान्य करण्यास पात्र आहे काय? | होय |
| ४ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

९) आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**कारणमिमांसा**

१०) **मुद्दा क्रमांक १:-** तक्रारदारास मंजूर करण्यांत आलेल्या वाढिव विज भाराचे काम DDF योजने खाली केले होते किंवा कसे,हा ,हया प्रकरणातील कळीचा व मुख्य मुद्दा आहे. वस्तुतः सदर प्रकरणांतील सर्व तथ्य (Facts) कागदपत्र, करारपत्र इ. उभयपक्षी मान्य आहेत. त्यांचा पुर्नउच्चार , विस्तार भयापोटी आम्ही टाळत आहोत.

११) सदरचे काम DDF योजने खाली करण्यांत आलेले आहे, हे दर्शविण्याकरीता वि.प. कंपनी कडून दिनांक ०७.०९.२०१७ चे वाढिव विज भार मंजूरीचे पत्र क्र. SE/KC/T/HT/LS/m/s.Trimurti Spinning Mills Pvt.Ltd/No.८१५७ चे ,तसेच पत्र क्र. SE/KC/T/HT/Est./m/s. Trimuriti Spinning Mills Pvt.Ltd/No.८१५८ दिनांक ०७.०९.२०१७ चे पत्र हया वर भर देण्यांत आला आहे. सदर दोन्ही पत्राच्या प्रती तक्रारदाराने दाखल केलेल्या आहेत. हया दोन्ही पत्रांत , तक्रारदारांचा वाढिव विज भार जोडणचा अर्ज; तांत्रिक मंजूरीचे पत्र क्रमांक SE/KC/T/HT/DDF.१.३%/urban/८२/१७-१८ दिनांक ३०.०८.२०१७ नुसार मंजूर झालेला असल्याचे ,नमूद केलेले दिसते व त्या पत्रांत करावयाची आवश्यक कामे व त्यांच्या खर्चाचे अंदाजपत्रक देण्यांत आलेले आहे. अंदाजत्रकानुसार खर्चाची रक्कम तक्रारदाराने धनादेशाद्वारे भरलेली असल्याचे वि.प. कंपनीने नाकारलेले नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

१२) वर नमूद पत्रक्र. ८१५७ मध्ये वाढिव विज भार देण्याकरिता काय कामे आवश्यक आहेत ते नमूद करण्यांत आलेले आहे हे नमूद करणे आवश्यक आहे, कि तक्रारदारास मुळ विज पुरवठा १३५० KVA चा चांदूर उपकेंद्रा वरुन देण्यात आलेला होता.तो विज पुरवठा DDF विज जोडणीद्वारे देण्यात आलेला होता असे तक्रारदार किंवा विज वितरण कंपनीचे म्हणणे नाही. तथापि चांदूर उपकेंद्रावर जास्त विज भार असलेने तक्रारदाराची वाढिव विज भाराची मागणी त्या उपकेंदावरुन देणे शक्य नसले कारणाने तिळवणी उपकेंद्रावर त्यास विज पुरवठा मंजूर करण्यांत आल्याचे उभय पक्षांने म्हणणे आहे. तिळवणी उपकेंद्रावरुन चांदूर उपकेंद्र व माणगांव उपकेंद्राला ३३kv चा विज पुरवठा होतो. हि बाब उभय पक्षी मान्य आहे.तक्रारदाराला वाढिव विजभार मंजूर करताना दिनांक ०७.०९.२०१७ चे पत्र क्र. ८१५७ चे पत्रात "The competent authority has accorded Approval for sanction of additional in power supply(sic) of 1350 + Add 933 = kw/Existing 1250 + Add300 = 1550 KVA connected Load on 33KV Industrial feeder from 220/33KV EHV Tilawan Sub-station , having Transformer capacity of (2 x100) 200 MVA in the name of M/s. Trimurti Spinning Mills Pvt. Ltd.,Gat No.20/2 Tilawani Tq. Hatkanangale Dist. Kolhapur ,under DDF scheme"
असे म्हटलेले आहे.त्याच पत्रात सदर अतिरिक्त विज भाराकरिता आवश्यक असणा-या मुख्य कामांचे विवरण दिलेले आहे ते खालील प्रमाणे .
**Major Scope of Estimate:-** "1) 33kv HT metering cubical CTs 25/5 A (0/25) 6 Nos. ; HT TOD meters 0.25 class – 02 Pos; 33kv HT Line (0.2 Panther) – 1.8 Km.; 33kv ACSR 0.1D.O.G. – 0.38 K.m. ; 33kv Line reconducting 0.60 k.m.; 33ikv under ground KLPE 240Sq.mm cable -240 meters " असे नमूद केलेले आहे. त्यात कुठेही तिळवणी उपकेंद्रावरुन तक्रारदाराचे प्रतिष्ठानापर्यन्त, स्वतंत्र विज वाहिनी टाकावी असे नमूद केलेले नाही. वि.प. कंपनीने हया मंचासमोर मांडलेल्या लेखी म्हणण्यात तक्रारदाराच्या वाढिव विज भारासंबंधी काय कामे केलीत त्यांचा तपशिल दिलेला आहे. त्यात, मंजूरी क्र. ८१५८ प्रमाणे (१) ०३ k.m. डबल सर्किट ०.२k.m. Panther (२) ०.१२ K.M. सिंगल सर्किट ०.१ D.O.G.(३) २४० sqmm भूमिगत विज वाहिनी १२० मिटर X २ ही कामे पुर्ण करुन घेतली असे म्हटले आहे. त्या लेखी म्हणण्यांत वि.प. कंपनीने तिळवणी उपकेंद्रापासून स्वतंत्र विज वाहिनी , तक्रारदाराचे खर्चाने उभी करुन त्यास वाढिव विज भारासह विज जोडणी दिलेली आहे, असे नमूद केलेले नाही. तथापि नविन वाहिनी चालू करते वेळेस व वाढिव विज लोड चालू करते वेळेस सदर ग्राहकाने ३३kv चंदूर वाहिनी वरुन भूमिगत विज वाहिनी काढून नविन केलेल्या ०.१२ k.m.सिंगल सर्किटला (३३k.v.औद्योगिक वाहिनी) ला जोडलेली होती, असे म्हटलेले आहे. हया म्हणण्यानुसार, जी ग्राहकाने ०.१२ k.m. ची भूमिगत वीज वाहिनी ३३kv औद्योगिक वाहिनीला जोडलेली होती, त्या वाहिनीला, कदाचीत वि.प. कंपनीने DDF औद्योगिक वाहिनी, म्हणत असल्याचे दिसून येते. जर Existing औद्योगिक विज वाहिनीला जर एखाद्या ग्राहकाने विज वाहिनी जोडली असेल, तर ती Tapping ची केस होते.

१३) मा. विज नियामक आयोगाने केस क्र. ५६/२००७ मधील आपल्या दिनांक १६.०२.२००८ चे आदेशात , महा.विज नियामक आयोग (विज पुरवठा संहिता व विज पुरवठयाच्या इतर अटी) विनिमय च्या कलम २.१(९) मधील DDF ची व्याख्या विशद करुन असे स्पष्ट केलेले आहे की, "Mere extension or tapping of the existing line (LT or HT) cannot be treated as Dedicated Distribution facility" मा. राज्य आयोगाचा हा आदेश विज वितरण कंपनीवर बंधनकारक आहे. आणि ती कायद्याची ठाम (Well settled )भूमिका आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

१४) दिनांक २९.१२.२०१७ रोजी जो,उभय पक्षात वाढिव विज भाराबाबत लेखी करार करण्यांत आला, त्यांची प्रत हया कामी दाखल करण्यांत आलेली आहे.त्या करार पत्रांत " Where as The Executive Engineer , M.S.E.D. C.Ltd. ,having office at Ichalkaranji , has sanctioned an estimate for ,and has permitted to execute the work by the Licensed Contractor, under ORC 1.3% supervision." असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. त्यात कोठेही सदरचे काम DDF योजने खाली केलेले असल्याचे म्हटलेले नाही. जरी मंजूरी पत्र क्र. ८१५७ व ८१५८ मध्ये DDF योजनेचा उल्लेख करण्यांत आलेला असला तरी ,जो दोन्ही पक्षांमध्ये concluded contract i.e. Agreement Dt.२१.१२.२०१७ झालेला आहे,तो concluded contract , मंजूरी पत्रांना Superseed करतो केवळ मंजूरी पत्रांनी उभय पक्षांमध्ये करार अस्तीत्वात येत नाही.मंजूरी पत्रांना केवळ प्रस्ताव (offers ) चे स्वरुप येते. कराराच हा प्रस्ताव मान्य झाल्यानंतरच अस्तित्वात येतो आणि ज्या ठिकाणी करार लेखी असतो. तेव्हा असा लेखी काररच मान्य करावा लागतो, आणि तो प्रस्ताव offers /counter offers वर चढ ठरतो. ही कायद्याची ठाम परीस्थिती आहे. (Settled Position of Law) विज वितरण कडून सदर करारपत्रांत O.R.C. असा उल्लेख चुकीने करण्यांत आला असल्याचा युक्तिवाद करण्यांत आला. तथापि तो युक्तिवाद, हया मंचाला त्यांच्या सिमीत कार्यक्षेत्रामुळे (Limited Jurisdiction ) मान्य करता येत नाही. एखाद्या कराराच्या वैधता/अवैधते बद्दल मत प्रर्दशित करुन/ती ठरवून करारच रद्द करण्यांच्या अधिकार केवळ आणी केवळ दिवाणी न्यायालयालाच आहे.हे मंच, त्या अधिकारांत अतिक्रमण करु शकतच नाही. तसेही पाहता जी कामे केल्याचे विज वितरण कंपनी आपल्या म्हणण्यात कथन करत आहे, ती कामे म्हणजे केवळ Line Tapping and /or maintenance स्वरुपाची असल्याचे दिसते. काही ठिकाणी , अस्तीत्वात असलेल्या ३३kv औद्योगिक वाहिनीवर तक्रारदाराचे खर्चाने Double Circuit ची कामे वि.प. कंपनीने केल्याचे दिसते. सबब प्रस्तुत प्रकरणांत , तक्रारदाराला वाढिव विज जोडणी DDF योजने खाली दिलेली नाही. असा हया मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर आम्ही नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक २ :-** ज्या अर्थी , तक्रारदारास देण्यात आलेला वाढिव विज भार हा DDF योजने खाली दिलेला नाही, हे सिध्द झालेले आहे , त्या अर्थी ,तक्रारदाराने करारा अंतर्गत विज जोडणीचा खर्च, हा त्यास परत मागण्याचा हक्क निर्माण होतो. मा. राज्य नियामक आयोग मा. उच्च न्यायालय व मा सर्वोच्च न्यायालयांनी , विविध न्यानिर्णयांमध्ये, DDF योजने अंतर्गत मंजूर विज जोडणी व्यतीरिक्त , इतर कोणत्याही योजने खाली मंजूर केलेल्या विज जोडणीचा खर्च ग्राहकाने केला असल्यास , तो विज वितरण कंपनीने परत करावा , ग्राहकांस विज जोडणी देण्याची विज वितरण कंपनीची कायदेशीर जबाबदारी असून , ती करीता लागणारा सर्व खर्च विज वितरण कंपनीने सहन करावयाचा असतो, असे ठाम निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे DDF व्यतिरिक्त इतर कोणत्याही योजने खाली विज पुरवठा करतांना, सर्व खर्च विज वितरण कंपनीने करण्याची , व असा खर्च ग्राहकाकडून वसूल केला असल्यास, तो योग्य त्या व्याजासह परत करण्याची कायदेशीर जबाबदारी , ही विज वितरण कंपनीची असते. ही कायद्याची Well settled Posistion आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणांत ग्राहका कडून भरुन घेतलेला खर्च रक्कम रु. ८,८४,३००/- फक्त परत करण्याचीं कायदेशीर जबाबदारी, प्रतिवादी विज वितरण कंपनीची आहे, असा हया मंचाचा ठाम निष्कर्ष आहे. सबब मुद्या क्र.२ चे उत्तर आम्ही होकारार्थी दिलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

**मुद्दा क्रमांक ३ :-** अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने पारीत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता , कक्षाने, तक्रारदारास मंजूर झालेला वाढिव भार DDF योजने अंतर्गत देण्यात आलेला आहे हा निष्कर्ष काढतांना कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. उलट पक्षी थेट उपकेंद्राला जोडणा-या वाहिनीवर टॅप कनेक्शन देता येत नसलेने, स्वतंत्र ३३kv वाहिनी टाकणे आवश्यक असलेने, ग्राहकास कोणताही बिनाकारण खर्च करणेस लावलेले नाही, असा निष्कर्ष, तो ही आपले आदेशाचे operative Part मध्ये काढलेला आहे. त्या निष्कर्षा करिता कोणतेही कारण किंवा मिमांसा केलेली नाही. केवळ विज वितरण कंपनी, म्हणते म्हणून , सदरचे connection DDF योजने खाली दिले, असे खालील कक्ष म्हणत असल्याचे दिसते, आणी अशा मोघम निष्कर्षावरुन तक्रारदारांस खर्चाचा परतावा मंजूर करता येत नाही, असा अन्यायमुलक निष्कर्ष काढून तक्रारदाराची मागणी अंशतः फेटाळलेली आहे. सबब सदरचा आदेश मान्य करता येत नाही.

१७) युक्तीवादा दरम्यान वि.प. कंपनी कडून असे प्रतिवादन करण्यांत आले की, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे आदेशाप्रमाणे तक्रारदारास वाढिव विज भार तिळवणी उपकेंद्राकडून देण्याची कारवाही करण्यांत आलेली आहे. तथापी सदर वाहिनीचे डिस्कस् फॅाल्टी असल्यामुळे विज पुरवठा खंडीत होत असले कारणाने तक्रारदारांस माणगांव उपकेंद्रावरुन तात्पुरत्या स्वरुपांत विज पुरवठा करणेत आला असून, तिळवणी उपकेंद्राचा ३३kv औद्योगिक वाहिनीचे फॉल्टी डिस्क बदलणेची कारवाही सुरु करणेत आली असून महिन्या भरात ते काम पुर्ण होईल व त्यानंतर सदर वाहिनीतून तक्रारदारास विज पुरवठा करणेत येईल. हया प्रतिवादनावरुन ही गोष्ट निर्विवादपणे शाबित होते की अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारदाराच्या हक्कांत अंशतः पारीत केलेल्या आदेशाबाबत विज वितरण कंपनीचा कोणताही उजर नाही. त्यामुळे कक्षाच्या आदेशातील त्या भागात कोणतेही बदल करण्याची आवश्यकता नाही. तथापी तक्रारदाराची खर्चाचा परतावा मागण्याची मागणी नकारणारा आदेश, हा मान्य करता येत नही. तो आदेश रद्द करुन वर नमूद कारणांकरिता, तक्रारदाराने केलेला रक्कम रु. ८,८४,३००/- चा खर्च विज वितरण कंपनीने, हया आदेशाचे तारखेपासून पुढील विज देयकातून, कराराचे तारखेपासून म्हणजेच दिनांक २१.१२.२०१७ पासून द.सा.द.शे. ८% व्याज दराने व्याजासह हप्त्या हप्त्याचे सवलत देवून /सूट देवून परत करावा, असा आदेश पारीत करणे योग्य व कायदेशीर राहिल, असा हया मंचाचा निष्कर्ष आहे.

सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

**आदेश**

१) तक्रारदाराचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.
२) २२० KV तिळवणी उपकेंद्रातून निघणा-या ३३KV विद्युत वाहिनीची Faulty Disc बदलून ,हया आदेशाचे तारखेच्या एक महिन्याचे आत , तक्रारदाराचे कनेक्शन त्यावर जोडून देण्यांत यावे.
३) तक्रारदाराने वाढिव विज भाराकरिता केलेला खर्च रक्कम रु. ८,८४,३००/- कराराचे तारखेपासून म्हणजे दिनांक २१.१२.२०१७ पासून द.सा.द.शे. ८% दराने व्याजासह हया आदेशाचे तारखेपासून पुढील विज देयकातून समान हप्त्याने सुट/सवलत तक्रारदारांस देवून, परत करावे

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR
महावितरण

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| ( पी.एस. पुजारी) | (एन.बी. बारसिंग) | (ए.व्ही. देशपांडे) |
|---|---|---|
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

केस नं- ४३ मध्ये माझे स्वतंत्र मत दिले आहे. ते सोबत जोडले आहे

सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

मी एन.बी. बारसिंग सदस्य,सचिव वरील निर्णयाशी मी सहमत नसून माझे स्वतंत्र मत देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **(वेगळे मत देण्यात आलेले आहे)**

तक्रारदार यांना त्यांच्या वाढिव वीज पुरवठा करण्यासाठी त्यांना DDF योजनेमध्ये अंदाजपत्रक तयार करुन सदर योजने अंतर्गत वाढिव वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.

म.रा.विज नियमक आयोगाच्या (विद्युत पुरवठा संहिता )( वीज पुरवठा इतर अटी व शर्ती.) नियमक २००५ ३.३.३ मधील तरतुदीनुसार वितरण परवाना धारकास ग्राहकास जर DDF सुविधा हवी असल्यास वितरण कंपनी त्या योजनसाठी लागणारा सर्व खर्च तक्रारदाराकडून घेण्याचा अधिकार आहे. ग्राहकाने स्व:मर्जीने DDF या योजनेची मागणी केलेली असल्यामुळे माझ्या मते तक्रारदाराला परतावा देता येणार नाही.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता इचलकरंजी ग्रामिण यांनी दाखल केलेल्या करार पत्रामध्ये जरी अनावधाने व नजर चुकीने DDF ऐवजी ORC नमूद केलेले असले तरी (It is clerical mistake) सद्यस्थितीत महावितरणमध्ये DDF योजने शिवाय कोणतीही योजना कार्यरत नाही. करारनाम्यात केवळ ORC ही योजना लिहल्यामुळे तक्रारदारास केलेला खर्चाचा परतावा देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही.सबब सदरील तक्रार मंचाने फेटाळणे योग्य होईल.

**दिनांक : २८.०१.२०१९**

**( एन.बी. बारसिंग)**
**सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर**

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण